करमाळा तालुक्याचे लोकप्रिय मुखपत्र...

परखड अग्रलेख | वस्तुनिष्ठ बातम्या
विविध सदरे | करमाळेकरांची खास ओळख

साप्ताहिक कमलाभवानी

# संदेश

वर्ष 31 वे

| www.saptahiksandesh.com | kamalabhavanisandesh@gmail.com |

संस्थापक संपादक : डॉ.ॲड.बाबूराव हिरडे
संपादक : सौ.उषादेवी बाबूराव हिरडे,
वेताळ पेठ, करमाळा, जि.सोलापूर
मो.९४२३३३७४८०




नं.७०४९७/९८ (दिल्ली) | पोस्ट परवाना PPR/01/2021-2023 | वर्षे ३३ वे | अंक क्र.१४७ | पाने-१२ | दि.१३/१०/२०२३ | दर शुक्रवारी प्रसिध्द | किंमत ४ रू.




# नवरात्र महोत्सवात कार्यक्रमांची रेलचेल - नऊ दिवस रक्तदान तर तीन दिवस आरोग्य शिबीर

करमाळा : करमाळा येथील जागृत देवस्थान श्री कमलाभवानी देवीच्या नवरात्र महोत्सवात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये १५ ऑक्टोबर पासून २३ ऑक्टोबर पर्यंत दररोज रक्तदान शिबीर होणार आहे. तर १९ ते २१ ऑक्टोबर या कालावधीत तीन दिवस आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे; अशी माहिती देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष सोमनाथ चिवटे व सचिव अनिल पाटील यांनी दिली आहे.

याबाबत जादा माहिती देताना ते म्हणाले, की आमच्या देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त सुशिल राठोड , डॉ.प्रदीपकुमार जाधव-पाटील, राजेंद्र वार्शिबेकर, ॲड.शिरीष



लोणकर, डॉ.महेंद्र नगरे तसेच प्रशासकीय अधिकारी महादेव भोसले व व्यवस्थापक अशोक गाठे या सर्वांच्या प्रयत्नातून नवरात्र महोत्सवाचे नियोजन करण्यात आले आहे.

१५ ऑक्टोबरला रविवारी सकाळी सहा वाजता डॉ.श्री व सौ.रोहन पाटील यांचे हस्ते घटस्थापना व आरती होणार आहे. तसेच २२ ऑक्टोबरला होमहवन होणार आहे. कमलादेवी ब्लड बँके मार्फत रक्तदान शिबीर घेण्यात येणार असून, शिबीरात सहभागी रक्तदात्यांना देवस्थान च्या वतीने कमलादेवीचा फोटो व प्रमाणपत्र वितरीत केले जाणार आहे. नवरात्र कालावधीत मानकरी, सेवेकरी, ट्रस्टी यांचे माध्यमातून भाविकांचे सुरसनईच्या साथीने स्वागताचा कार्यक्रम आयोजित केला आहे. दररोज सायंकाळी महाआरतीसह अष्टकही घेतले जाणार आहे.

**विशेष उपक्रम...**

- सरपंच महेश सोरटे व उपसरपंच सौ.थोरबोले, सर्व सदस्य व ग्रामसेवक यांनी मंदिर परिसर आणि संपूर्ण श्रीदेवीचामाळ याची उत्तम स्वच्छता केली असून, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली आहे.
- माजी नगराध्यक्ष प्रशांत ढाळे व त्यांच्या सहकाऱ्यांकडून मंदिरात येऊन कमलादेवीचे सर्व दागिणे विनामोबदला उजळून देतात.
- माही डेकोरेशनचे मंगेश गोडसे व मराठा मंदिर डेकोरेशनचे दत्ता रेगुडे यांच्या मार्फत विना मोबदला मंदिर व मंदिर परिसराचे उत्कृष्ट डेकोरेशन करण्यात आले आहे.

पुढील मजकूर पान नं.२ वर..



शेतीशिवाय जग जगू शकत नाही. त्यामुळे शेतीला प्राधान्य दिलेच पाहिजे.

## संपादकीय.........................................!

# पेरणी...

खरीपाच्या पेरण्या झाल्या आणि पाऊस गायब झाला. पावसाअभावी खरीपाची पिके वाया गेली. विहिर, नाले, तलाव पावसाळ्यातच कोरडे पडू लागले. अशा स्थितीत उशीरा का होईना पण गणपतीबरोबर पाऊसही आला आणि निराश झालेल्या शेतकऱ्यांच चेहऱ्यावर आनंद दिसू लागला. सध्या वापसा झाल्याने करमाळा परिसरातील गावात जोरदार पेरण्या सुरू आहेत.

'पेरणी' म्हणजे बियाणे जमिनीत पेरण्याची प्रक्रिया असते. जमिनीला योग्य वापसा (वापसा म्हणजे चिखलही नसावा व जमिन एकदम कोरडीही नसावी) असावा लागतो. पेरणी करताना योग्य खोली, योग्य अंतर हे महत्वाचे ठरते. पेरणी करताना आजही दोन प्रकारे पेरणी केली जाते. एक बैलाद्वारे आणि दुसरी ट्रॅक्टरद्वारे. प्रत्येकाची पेरणीचे यंत्रे वेगवेगळी आहेत. याशिवाय जमिनीत रेघा ओढून बी लावून पेरणी केली जाते. या प्रक्रियेला उशीर लागत असल्याने व मजुरी जादा जात असल्याने बैलाद्वारे किंवा ट्रॅक्टरद्वारे पेरणी केली जाते. पेरणीसाठी बियाणे हे अत्यंत महत्वाचे असते. यामुळेच शेतकरी जेव्हा धान्य मळणी केले जाते तेव्हाच शेलके धान्य बियाणासाठी बाजुला काढून लिंबाचा पाला लावून तसेच किटकनाशक चोळून बाजुला काढून ठेवतो. अलिकडे संकरीत बियाणे मोठ्या प्रमाणात उत्पादीत होत असल्याने त्याचाही मोठ्या प्रमाणात वापर होतो.

योग्य वापस्याला पेरणी केली तर बियाणे चांगले उगवते. मात्र वापसा नसेलतर बियाणे योग्य प्रमाणात उगवत नाहीत. आणि मग शेतकऱ्यांना दुबार पेरणी करावी लागते. पेरणी किती महत्वाची आहे हे सांगताना संत तुकोबाराय म्हणतात..

"मढे झाकुनिया करीती पेरणी । कुणबीयाचे वाणी लवलाहो ।।
तया परि करी स्वहित आपुले । जयासि पावले नरदेह ।।धृ।।
ओटीच्या परीस मुठीच्या ते वाढे । या परि कैवाडे स्वहिताचे ।।"

कुणबी लोकांची जात पेरणी विषयी इतकी दक्ष असते, की त्यावेळी घरात कोणी मेलेले असेल तरी त्याचे मढे झाकून ठेवतात आणि पेरणी करायला धावतात. ....

तिसऱ्या चरणात पेरणी करण्याकरीता ओटीमध्ये बी घेऊन यातील मुठभर दाणे शेतकरी पाबरीच्या ठेवतो. ते जमिनीत पडतात तेव्हा हातातील जाण्यापेक्षा ते अनेकपटीने वाढतात म्हणजे योग्य वेळी पेरणी किती महत्वाची आहे, हे यातून स्पष्ट होते.

ज्ञानेश्वरीमध्ये ज्ञानेश्वरांनी १३ व्या अध्यायात म्हटले आहे..

'नाना कृषीवळू आपुले । पांयुरवी पेरिले । तैसे झाकी निपजले । दानपुण्य ।।' म्हणजे शेतकरी पेरणी करताना धान्याचे दान भुमातेला देतो तेव्हा तो उघडे दान देत नाहीतर तो जमिनीच्या आत ते दान टाकतो आणि म्हणून भुमाता शेतकऱ्याला भरभरून प्रतिदान देते.

पेरणीच्या संदर्भात अशोक कोळी यांनी 'धूळ पेरणी' म्हणून कविता लिहिलेली आहे. ती चौथीच्या वर्गाला आहे. त्यात ते म्हणतात..

"असो बरकत धुळपेरणीला, लागला मातीचा जीव झुरणीला..
हिरव्या पिसांचा ध्यास धरणीला, टिपूर मोत्यांची आस मोरणीला..
येऊ नये कधी दिवस जाचक, कासावीस डोळे बनले चातक..
कोरडे नक्षत्र पूर पापणीला, आलेल आभुट दूर दाटणीला..
मिळता डोळ्यांना मेघुट इशारे, मातीच्या कणांना फुटले धुमारे.."

या कवितेत वापसा गेल्यानंतर किंवा पाऊस पडण्याच्या अगोदर पेरणी केल्यानंतर काय घडू शकतं, याचं उदाहरण दिलेले आहे. मेघांचे इशारे मिळताच मातीतील पेरलेल्या दाण्यांना कसे धुमारे फुटतात असेही कवि सांगतो. तर चंदन धुमाणे हे कवी पेरणीचं वर्णन करताना म्हणतात..

"मृग नक्षत्राच्या सरी, आल्या साऱ्या धारेवर...
चिंब झाली काळी आई, आला पाऊस भू वर...
सुखावला बळीराजा, पेरणीला सुरूवात...
करी आनंदाने राजा, जमिनीची मशागत..."

तर करमाळ्याचे कवी प्रकाश लावंड हे 'काडवान' या कवितासंग्रहातील 'वारसा' या कवितेत म्हणतात..

"मला तिफणीवर उभं करून,
तुम्ही माझ्या मुठीत बियाणं दिलंत...
तेव्हा मी पेरणीची धुळाक्षरं,
काकरीतून गिरवू लागलो...
चुकत-माकत वेडीवाकडी वळणं घेत,
तुमच्या करड्या नजरेखाली,
माझं शिकणं चालू झालं..."

आणि शेवटी असं म्हणतात..

'ही शेतकामातील कष्टाळू साक्षरता
माझ्यात चांगली रूजली आहे
बियाण्यांसारखी...'

अशी पेरणी करण्यापूर्वी शेतकऱ्याला नांगरट, मोगडा, पाळी यालावी लागते. शेत तणमुक्त करावे लागते आणि रानही भुसभुसीत ठेवावी लागते. तेव्हाच या पेरणीचा आणि बियाणाचा फायदा होतो, अन्यथा खर्च वाया जातो.

शेतकऱ्याच्या शेतातील पेरणी जशी महत्वाची आहे, तशीच प्रत्येक माणसाच्या जीवनातील विचाराची पेरणी महत्वाची असते. शेतकऱ्याच्या एका पेरणीनं एका वर्षाचं धान्य मिळतं, प्रत्येक माणसाच्या मनात विचाराच्या केलेल्या पेरणीनं संपूर्ण आयुष्याचं पिक मिळतं. त्यामुळे शेतीत कोणतं बियाणं महत्वाचं तसंच माणसाच्या जीवनात कोणते विचार महत्वाचे याचा विचार व्हावा लागतो. किंबहूना त्यावरच माणसाचं जगणं अवलंबून असतं. शेतीसाठी बियाणं राखून ठेवावं लागत किंवा बाजारात विकतही मिळतं. पण विचाराच बियाणं हे संगतीतून, वाचनातून, चांगल्या ऐकण्यातून मिळतं. संगत चुकीची लागली की जगणं बिघडतं. तिथंच व्यसन, द्वेष, मत्सर, चोरी, दरोडे-खुन याचे विचार रूजले जातात आणि आयुष्य उध्वस्त होतं. जर संगत चांगली मिळाली, शिकवणारे चांगले भेटले आणि त्याच विचारांवर संबंधिताची वाटचाल सुरू झालीतर आयुष्य उत्तम घडतं. त्यामुळे शेतकऱ्याच्या एका वर्षाच्या पेरणी पेक्षा शेतकऱ्याच्या मुलावर कोणत्या संस्काराची पेरणी केली जाते यावरच शेतकऱ्याचं भविष्य आणि आयुष्य अवलंबून राहतं.

पान नं.१ वरून पुढे...

## नवरात्र महोत्सवात कार्यक्रमांची रेलचेल

### विशेष उपक्रम...

- अन्नछत्र मंडळा मार्फत नवनाथ सोरटे, शिवाजीराव पवार, प्रमोद गायकवाड व त्यांच्या सहकाऱ्यांकडून नऊ दिवस दररोज बारा ते तीन या कालावधीत फराळ वाटपाचे नियोजन
- देवस्थानच्या वतीने जाकीर मंडप सर्व्हिस यांचे मार्फत मंदिर, शिखर व दीप माळाची विद्युत रोषणाईचे नियोजन
- देवस्थान मार्फत मंदिर व मंदिर परिसर व ओवऱ्या प्रेशर पाण्याने स्वच्छ
- ग्रामपंचायत श्रीदेवीचामाळ व देवस्थान यांचे मार्गदर्शनाखाली कराड, कोल्हापूर, सातारा येथील पाळणे, खेळणी व अन्य दुकानांचे व्यवस्थापन पूर्ण
- मंदिराच्या आवारात आठही दिवस आराध्यांच्या कार्यक्रमाचे आयोजन
- पुजारी- दादासाहेब पुजारी, ओंकार पुजारी, नारायण सोरटे, कमलाकर सोरटे, किसन सोरटे, रविंद्र सोरटे, सचिन सोरटे तर पुरोहित शाम पुराणिक, रविंद्र पुराणिक, सुशिल पुराणिक यांच्या माध्यमातून दररोज सकाळी नऊ व रात्री नऊ महाआरतीचे नियोजन.

## वॉचमनकडून लोखंडी अँगलची चोरी

करमाळा (सं.प्र.) : वॉचमन म्हणून ठेवलेल्या तरूणाने ४५ हजार रूपये किंमतीचे सात फुट लांबीचे ९० लोखंडी अँगल चोरून नेले आहेत. हा प्रकार जेऊर, ता.करमाळा येथे घडलेला आहे. यात शांतीलाल गोविंद बागवाले (रा.टेंभूर्णी) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की माझा जेऊर येथे प्लॉटींगचा व्यवसाय आहे. माझ्याकडे मयुर बाजीराव काळे रा.कव्हे ता.माढा हा वॉचमन म्हणून होता. त्याने माझ्या परस्पर साईटवरील १०६ लोखंडी अँगल पैकी ४५ हजार रू. किंमतीचे ९० लोखंडी अँगल चोरून नेले आहेत.

।। विश्वास हीच परंपरा ।।
आनंद ड्रायफ्रुटस्
प्रोप्रा : अमोल र. हिरण
मो.9270496867, 7057258385
खास नवरात्र उत्सवानिमित्त..
स्वादीष्ट व चविष्ट उपवासाचे पदार्थ मिळण्याचे ठिकाण !

- राजगिरा पीठ, भगर पीठ, सिंगाडा पीठ
- चौकोनी भगर, पापड, दळायची भगर,
- सोमवार भाजणी
- सर्व प्रकारची शेंगदाणा चिक्की,
- राजगिरा, गुडदाणी, केळीचे वेफर्स,
- शाबुदाणा पापडी, हिरवी मिरची वेफर्स,
- उपवासाचे स्क्रू, उपवासाचे लोणचे, उपवासाचे बिस्कीट
- खडके कंपनीचे राजगिरा व शेंगदाणा चिक्की, राजगिरा रोल
- खजूर, शेंगदाणा तेल, शाबुदाणा चिवडा,
- शाबूदाणा, शेंगदाणे, भगर, शेंगदाणा लाडू
उत्कृष्ट कंपनीचे व क्वॉलिटीचे ड्रायफ्रुट मिळेल
संपर्क एच.यु.गुगळे कापड दुकाना समोर, मेनरोड, करमाळा.

सा.कमलाभवानी संदेश हे साप्ताहिक प्रकाशक, मालक, मुद्रक सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी संदेश प्रिंटर्स, वेताळपेठ, करमाळा येथे संपादक म्हणून सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी छापून तेथेच प्रसिध्द केले. (या अंकातील मजुकराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

# करमाळा वकील संघाची आगळी-वेगळी परंपरा



करमाळा(सं.प्र.) : करमाळा वकिल संघ हा जिल्ह्यातच नव्हेतर महाराष्ट्रात आगळा-वेगळा वकिल संघ आहे. येथे वकीलांची संघटीत शक्ती महत्वाची आहे. वर्षानुवर्षे वकिल संघाची निवडणूक ही बिनविरोध होत असून क्रमानुसार वरीष्ठ वकिलाला अध्यक्ष पद दिले जाते. वकील संघाच्या कोणाही सदस्याविरूध्द अन्याय झाल्यास वकिल संघाचे सर्व सदस्य एकजुट होऊन त्या अन्यायाच्या विरूध्द लढतात. एवढेच नव्हेतर संकटसमयीही हा वकिल संघ पुर्ण ताकदीने पाठीशी उभा असतो. करमाळा वकिल संघाचे माजी अध्यक्ष ॲड.आजिनाथ शिंदे यांचे नुकतेच आकस्मात निधन झाले. त्यांच्या दु:खद प्रसंगात वकिल संघाचे सर्व सदस्य हजर होते. परिवाराला धीर देणचे काम केलेच, पण त्यानंतर वकिल संघाने स्वयंस्फुर्तपणे वर्गणी गोळा करून १ लाख ५० हजार रू. शिंदे परिवाराला दिले आहे. त्यातील एक लाखाचा धनादेश ॲड.शिंदे यांच्या कन्येकडे दिला आहे तर ५० हजार रू. ॲड.शिंदे यांच्या वैद्यकिय उपचारासाठी दिले आहेत. वकिल संघाची ही आदर्श परंपरा असून न्यायकक्ष व वकील संघ यांचा वर्षानुवर्षे समन्वय राहिलेला आहे. न्यायालयातील प्रत्येक ॲक्टीव्हीटीज मध्ये वकिल संघ सहभागी असतो. खऱ्या अर्थाने या संघाचा आदर्श घ्यावा असा वकिल संघ जिल्ह्यात आगळावेगळा आहे.

# कांतीलाल बाबुलाल सोळंकी यांचे अल्पशा आजाराने निधन



करमाळा(सं.प्र.) : येथील वर्धमान जनरल स्टोअर्सचे मालक कांतीलाल बाबुलाल सोळंकी (वय-७०) यांचे १० ऑक्टोबरला अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, दोन मुली, एक मुलगा असा परिवार आहे. विलासराव घुमरे पतसंस्थेचे पिग्मी एजंट धीरज सोळंकी यांचे ते वडील होते. त्यांचे अत्यंविधी प्रसंगी सर्व स्तरातील नागरीक उपस्थित होते.

साक्षी डेंटल केअर सेंटर
दातांचा दवाखाना
डॉ.उषा कुसकर B.D.S.(Reg No.A-12475)
दाताची मोफत तपासणी
१३ वर्षापासून दंत चिकित्सक सेवेत...
- दंत उपचार सल्ला व मार्गदर्शन
- रूट कॅनॉल ट्रिटमेंट
- वेडे-वाकडे दात सरळ करणे
- अंशत: व संपूर्ण कवळी बसवणे
- मेटल, सिरॅमिक, झरकोनिया कॅप ब्रिज बसवणे/क्लिप बसवणे
- फिक्स दात बसवणे, दात काढणे
- ब्लिचींग, इंम्पलाट, एक्स-रे काढणे
- कॉस्मेटिक दंतचिकित्सा
- बाल दंत उपचार
- हिरड्यांच्या आजारावरील उपचार व शस्त्रक्रिया
- दातांच्या रंगाचे सिमेंट, चांदी, जी.आय.सी., कम्पोझिट भरणे
- मशीनद्वारे दात साफ करणे व दात पांढरे करणे.
- अक्कल दात काढणे, काढ-घालण्याचे दात व फिक्स दात बसवणे.
- दातांमधील फटी कमी करणे
- स्माईल डिझायनिंग

वेळ : सोमवार ते शुक्रवार सकाळी ९ ते रात्री ८, शनिवारी सकाळी ९ ते दुपारी २ पर्यंत, रविवार बंद
संपर्क मो.9325544337
एस.टी.स्टॅन्ड समोर, बँक ऑफ इंडिया शेजारी, विक्की प्लाझा, पहिला मजला, करमाळा.

# तालुकास्तरीय भव्य सांप्रदायिक भजन व शास्त्रीय संगीत गायन स्पर्धा

करमाळा(सं.प्र.) : भारतीय जनता पार्टीचे तालुका अध्यक्ष तसेच सोलापूर जिल्हा नियोजन समितीचे सदस्य गणेश चिवटे यांच्या वाढदिवसानिमित्त २२ व २३ ऑक्टोबरला तालुकास्तरीय भव्य सांप्रदायिक भजन व शास्त्रीय संगीत गायन स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेसाठी प्रवेश नि:शुल्क राहणार आहे. ही स्पर्धा करमाळा तालुका भजनी मंडळ व श्रीराम प्रतिष्ठान यांचे संयुक्त विद्यमाने करमाळा येथे होणार आहे. या स्पर्धे अंतर्गत सामुदायिक भजन स्पर्धा, वैयक्तीक भजन स्पर्धा, वैयक्तीक शास्त्रीय नृत्य स्पर्धा, वैयक्तीक शास्त्रीय संगीत स्पर्धा, वैयक्तीक शालेय संगीत स्पर्धा (प्रार्थना/देशभक्ती गीत), लोकसंगीत (व्यसनमुक्ती गीत/पर्यावरण गीत) स्पर्धा होणार आहेत. यातील विजेत्या स्पर्धकांना ५०० रू. पासून ५००० रू. पर्यंत बक्षीसे देण्यात येणार आहेत. २२ ऑक्टोबरला सकाळी नऊ वा. दत्तमंदिर, करमाळा येथे स्पर्धेचे उद्घाटन भजनसम्राट ह.भ.प.बापूराव बागल महाराज, ह.भ.प.रामभाऊ निंबाळकर महाराज, ह.भ.प.ज्ञानेश्वर माऊली झोळ, ह.भ.प.विठ्ठल पाटील महाराज, डॉ.ॲड.बाबूराव हिरडे आदींच्या हस्ते होणार आहे. यावेळी पोलीस निरीक्षक ज्योतीराम गुंजवटे, गटविकास अधिकारी मनोज राऊत, नायब तहसीलदार विजयकुमार जाधव, संगीत विद्यालयाचे प्राचार्य बाळासाहेब नरारे, दादासाहेब पालके, भीमराव शिंदे, ज्ञानेश्वर फुले, बंडोपंत पानसरे, ज्ञानेश्वर पानसरे, मच्छिंद्र अभंग, नारायण डौले आदी उपस्थित राहणार आहे.

अत्याधुनिक सोयीसुविधेसह आपल्या सेवेत नव्याने दाखल...
विकी मंगल कार्यालय
एस.टी.स्टॅन्ड समोर, बँक ऑफ इंडिया शेजारी, करमाळा., जि.सोलापूर
संपर्क : मराठा मंदिर इव्हेन्ट मॅनेजमेंट - 8855885578
सुविधा..
- भव्य स्टेज 32 x 25 फुट
- बुफे जेवण सेट उपलब्ध
- जेवणासाठी टेबल, खुर्च्या व्यवस्था
- जनरेटर 20kv सुविधा
- स्वतंत्र शाकाहारी किचन व्यवस्था
- एकाच पंगतीमध्ये ५०० लोकांची जेवणाची व्यवस्था
- वधु-वर कक्ष रूम उपलब्ध
- पुरूष/महिलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह
- प्रमुख पाहूण्यांसाठी रूमची सुविधा
- छोट्या कार्यक्रमासाठी ३० X १०० चे २ हॉल उपलब्ध

लग्नसमारंभ पॅकेज
- जेवण सेटअप (२०००, १५००, १००० व ५०० लोकांसाठी), बुफे जेवणाचा सेटअप किंवा टेबलखुर्ची दोन्ही सेटअप उपलब्ध
- वधू व वराचे हार-२, गुच्छ-२, गजरे-१०० नग
- प्रमुख पाहूण्यांचे स्वागत व सुत्रसंचालक
- प्रमुख पाहूण्यांसाठी १०० फेटे
- घोडा(वरातीसाठी)
- पिण्यासाठी फिल्टरचे पाणी







- डेकोरोशन(स्टेज, मेहंदी/हळदी/संगीत)
- बॅन्ड/डिजे/बॅन्जो(हळदी/लग्नसमारंभ)
- पंडितजीसह पुजेचे सर्व साहित्य
- फोटोग्राफर
- अक्षदा पाकीट
- मेहंदी, रांगोळी(हॉल समोर)

वाढदिवस समारंभ पॅकेज
नामकरण समारंभ पॅकेज
डोहाळे जेवण पॅकेज

# व्हायचं होतं डॉक्टर पण झाले डायरेक्टर

आमच्या घरात आम्ही चौघी मुलीच. आम्हाला भाऊ नाही. वडीलांच स्वप्नं आम्ही डॉक्टर व्हावं असं होतं. त्यासाठी आम्ही प्रयत्नही केला, पण एन्ट्रान्स परीक्षेत चार-पाच मार्कावरून प्रवेश मिळाला नाही. त्यानंतर मी तेलंगणा येथील उस्मानिया विद्यापीठातून १९८६ साली बी.एस्सी पास झाले. दरम्यान माझ्या वडीलांनी मला व माझ्या बहिणींकडून स्कुटर चालविणे, कॉम्प्युटर शिकणे अशा अत्यावश्यक बाबी पूर्ण करून घेतल्या होत्या. त्यानंतर काही वर्षानी लग्नाबाबत चर्चा सुरू झाल्या आणि करमाळा येथील 'करमाळा भूषण' गिरधरदास देवी यांचे चिरंजीव कन्हैयालाल देवी यांचा प्रस्ताव आला. त्यावेळी माझ्या वडीलांनी मला विचारले.. "करमाळा शहर हे छोटे गाव आहे. तुला जमेल का ? त्यावेळी माझ्या आईनं मध्येच असे सांगितले की ती हुशार मुलगी आहे. तिच्याकडे कला आहेत. ती आपल्या कला कुठही फुलवू शकते !" त्यानंतर मग आमचं लग्न सन १९९१ मध्ये माझ्या माहेरी निजामबाद येथे झाले.

लग्नानंतर मी करमाळा येथे आले, त्यावेळी माझे सासरे करमाळा नगरीचे नगराध्यक्ष होते. माझे माहेर आणि सासर यामध्ये खुप अंतर होते. त्यात भाषा, राहणीमान, आहार असा सर्वच बदल होता. पण देवी परिवारातून मला इतकी चांगली वागणूक मिळाली की त्यामुळे मला या बदललेल्या परिस्थितीची आठवणही झालेली नाही. लग्नानंतर मी क्लासही घेतले तसेच एलिमेंट्री, इंटरमिडीयट, ड्रॉईंग आदीचे क्लास केले. तसेच गाण्यात संगीत विशारदही झाले.

माझे सासरे, सासू व पती या सर्वांचीच मला फार मोठी साथ मिळाली. माझ्या दोन मुली नंदिनी व अनन्या तर मुलगा अनुज ही थोडी मोठी झाली की त्यांच्या शिक्षणासाठी मी पुणे येथे थांबले व मुलांचे शिक्षण चांगले करून घेता आले. माझे शिक्षण इंग्लीश मेडिअम मध्ये झाले असल्याने त्याचा फायदा येथे करता येईल का याचा विचार झाला आणि त्यातूनच



## नवरा माझा...

नवभारत इंग्लीश स्कुलची जबाबदारी माझ्यावरती पडली. भई व पती यांचे पूर्ण पाठबळ तर होते; पण आमच्या कामात कोठेही हस्तक्षेप नव्हता. नवभारत इंग्लीश मेडियम स्कुलचे काही वर्ग आम्ही वेगळ्या पध्दतीने पेंट केले. मी, नंदीनी तसेच अनन्या यांनी खूप मदत केली. आमच्या या कामासाठी बोकन मॅडम, इवरे मॅडम, रिनाज मॅडम यांचे मदतीने सगळ्या फाईल्स तयार केल्या आणि विद्यार्थ्यांसाठी मी स्वत: इंग्लीश व इतर विषय शिकवत होते. ८१ मुले होती, खर्चाला पैसे पुरत नव्हते. पण त्या अडचणीवर मात करत आम्ही आमचं काम पुढे सुरू केलं. माझ्या पतीने मला अकौंट व बँकींग शिकवलं, त्याचा फायदा झाला. आणि श्री गिरधरदास देवी प्रतिष्ठानचे डायरेक्टर म्हणून सर्व प्रकारचे काम करताना मला आवडही होती आणि आनंदही वाटत आहे. आता सध्या गिरधरदास देवी विद्यालय, नवभारत इंग्लीश मेडियम व ट्वींक्लींग स्टार्स मध्ये सध्या ९०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

शाळेची प्रगती करताना माझे सहकारी शिक्षकांची खूप मोठी साथ मिळाली आहे. तर विद्यार्थ्यांच्या पालकांनीही मोठे पाठबळ दिल्याने संस्थेचे कामकाज मोठे वाढले आहे. या कामाची दखल घेऊन यशकल्याणी संस्थेचे अध्यक्ष गणेश करे-पाटील यांनी शिक्षण गौरव पुरस्कार जाहीर केला आहे.

वैयक्तीक प्रपंचातही सुरूवातीपासून मी समाधानी आहे. माझा मुलगा अनुज हा लंडन मधून एमबीए झाला आहे. माझी सुन ध्वनी , नंदिनी एम.एम.सी.सी. मधून इंटेरियर सेट डिझायनर झालेली आहे. तर अनन्या ही पहिल्या प्रयत्नात सी.ए. झालेली आहे. माझे वडील गोपाळदास शहा व आई प्रमिलाबेन शहा यांचे जसे पाठबळ लाभले तसेच येथे भई व भाभी यांची साथ लाभली. माझ्या आई-वडीलांना भई व भाभी यांच्या सूचनेवरून मी करमाळा येथे घेऊन आले होते. वडीलांच्या निधनानंतर आई माझ्या सोबतच राहत होती. मला भई, भाभी यांचेमुळे त्यांची सेवा करता आली.

***

> माझ्या लग्नानंतर करमाळ्यात आले तेव्हा सर्वच नवीन होते. मला मराठी समजत होते, पण बोलता येत नव्हते. गुजराती भाषेवर घरातील संभाषण चालत होते. माझे पती कन्हैयालाल देवी यांनी मला समजून घेऊन मराठी शिकवले तसेच अनेक महिला मैत्रीणी भेटल्या. त्यामुळेही मला करमाळ्यात करमत गेले. माझे पती व्यापार, राजकारण व समाजकारणात व्यस्त असतात. पण तितक्याच तन्मयतेने ते परिवारात रमतात आणि परिवारासाठी कष्टही घेतात. असा भाग्यवान पती मिळाला हे माझे भाग्य आहे. मी माझ्या संसारात खूप आनंदी व समाधानी आहे.
>
> **...सौ.सुनिता कन्हैयालाल देवी**
> (डायरेक्टर, नवभारत इंग्लीश स्कुल)
> मो.९४२३०६५४२३

# शिक्षण अवघं नववी, व्यवहार मात्र करोडोचा !

"लहरोंसे डरकर नौका पार नही होती । कोशिश करनेवालोंकी हार कभी नही होती ।" हरिवंशराय बच्चन यांच्या कवितेचा यथार्थ अनुभव वीट येथील केशव कांतीलाल चोपडे (पप्पू) यांच्या वाटचालीकडे पाहून येतो. केशव चोपडे यांच शिक्षण अवघं नववी असं असूनही वयाच्या ३८ मध्येच या तरूणानं करोडोंचा व्यवहार करून एक वेगळं यश संपादन केले आहे.

केशव चोपडे हे घरात एकुलते एक आहेत. त्यांची बहिण सौ.उज्वला राजेंद्र आवटे (रा.पडस्थळ, ता.इंदापूर) येथे आपल्या घरी सुखी आहेत. वडील कांतीलाल एकनाथ चोपडे व आई सावित्रीबाई कांतीलाल चोपडे हे दोघेही घरची १२ एकर शेती वहिवाटत आहेत. शिक्षण अपुरं असल्याने नोकरी नाही आणि शेतात वेगळं काही काम नाही. पण मोठं होण्याची जिद्द. त्यामुळे केशव चोपडे यांनी खूप विचार केला आणि सन २०१८ मध्ये पोकलॅन्ड घेण्याचे ठरविले. मित्र, नातेवाईक व हितचिंतकांकडून जेवढी जमेल तेवढी रक्कम घेतली आणि श्रेया फायनान्सकडून ७० लाख रू. फायनान्स घेऊन शायन एल.आर २१० हा पोकलॅन्ड घेतला. सुरूवातीला यु.पी. वरून अर्जुनसिंग हा ऑपरेटर भेटला.



## केशव चोपडे यांची वेगळी वाट

त्यानंतर तालुक्यात जिथे मिळेल तिथे विहिरीची कामे घेतली. कामातील सचोटी, ग्राहकांशी उत्तम समन्वय आणि दिलेला शब्द पाळण्याची क्षमता यामुळे श्री.चोपडे यांना काम कमी पडले नाही. काम इतके वाढले की.. त्यांना पुन्हा २०२१ मध्ये हुंडाई २०१५ (५० फुटी) ७४लाखाचे पोकलॅन्ड एचडीएफसी बँकेच्या सहकार्याने घेतले. दोन पोकलॅनचा व्याप वाढत गेला, कामही वाढत गेले. संपर्कही वाढत गेला. त्यामुळे श्री.चोपडे यांना सतत कामात गुंतून पडावे लागले. या माध्यमातून कामगारही वाढले आणि प्रवासही वाढला. त्यामुळे त्यांना स्कार्पिओ चारचाकी गाडी घ्यावी लागली. एवढेच नाहीतर नुकतेच शाईन एलआर २१५ हे तिसरे ७५ लाख रू. किंमतीचे पोकलॅन्ड एचडीएफसी बँकेच्या सहकार्याने घेतले आहे. अलिकडे मुंबई भागात जोरदार कामे सुरू झाली असल्याने श्री.चोपडे यांनी तीनही पोकलॅन्ड मुंबईला भाड्याने दिलेली आहेत. एक सामान्य माणूस जिद्दीच्या जोरावर किती यश कमवतो हे वीट येथील केशव कांतीलाल चोपडे यांच्या प्रयत्नातून दिसून येते.

> माझ्या आई-वडीलांचे कष्ट पाहून व ते देत असलेली साथ लक्षात घेऊन पोकलॅन्डचा निर्णय घेतला. कोणत्याही प्रकारे व्यसन न करता चांगल्या मित्रांच्या संगतीत राहिल्याने मला यश मिळाले आहे. विशेषत: माझी पत्नी सौ.स्वाती हिची जी साथ व पाठबळ लाभले त्यामुळे काम करताना उत्साह वाढत गेला. माझी मुलगी प्रांजल व मुलगा सार्थक हे दोघेही अनुक्रमे ८ वी व ६ वीत शिक्षण घेत आहेत. एकंदरीत परिवाराची साथ मिळाल्याने व चांगल्या मित्रांची संगत लाभल्याने मला यशस्वी होता आले.
>
> **...केशव चोपडे (पप्पू) मो.७४४७६२५५५५**

# सवय... ♦♦♦ बोधकथा

एका माणसाने त्याच्या घरी एक पोपट पाळला होता. पिंजऱ्यात ठेवलेल्या पोपटाला चांगले खायला-प्यायला मिळत असे. पोपट बोलका असल्याने घरातील लोकांकडून त्याचे फार कौतूकही केले जाई. पण पोपटाच्या मनात मात्र पारतंत्र्याचे शल्य दाटून येई.

अखेर एके दिवशी पोपटाला संधी चालून आली. त्या माणसाने पोपटाला खाणे देण्यासाठी पिंजऱ्याचे दार उघडले होते व त्याच्या हातून ते तसेच उघडे राहिले होते. माणसाला अचानक काही काम आल्याने तो ते दार उघडे टाकून निघून गेला असता, पोपट पिंजऱ्याच्या बाहेर निघून गेला. पण लहानपणापासूनच पिंजऱ्यात राहिला असल्याने त्याला फारसे नीट उडताच येत नव्हते. एका झाडावर गेला असता त्याला इतर पोपटांशी बोलता येईना. कारण लहानपणापासूनच तो परकी भाषा शिकत असल्याने त्याला पोपटांची भाषा येत नव्हती. म्हणून इतर पोपटही त्याला सहकारी मानत नव्हते. पिंजऱ्यात आयते खाण्याची सवय असल्याने त्याला अन्न मिळवणे अवघड जावू लागले व ऊन, वारा, पाऊस यांची कधीच सवय नसल्याने तो आजारी पडला व मरून गेला.

**तात्पर्य : जास्त काळ पारतंत्र्यात (गुलामगिरीत) राहिल्याने तशीच गुलामगिरीची सवय अंगात मुरून राहते. मग परक्याची भाषा, संस्कृतीचं आपली वाटू लागते आणि मिळालेले स्वातंत्र्य टिकवण्यासाठीची जिद्द अंगी राहत नाही. परक्या संस्कृतीचे चांगले काही घेताना आपल्या संस्कृतीचे विस्मरण होऊ न देणे हाच खरा शहाणपणा..!**




# निवडणूका तर जाहीर झाल्या.. प्रासंगिक

करमाळा तालुक्यातील १६ ग्रामपंचायतीच्या निवडणुका जाहीर झाल्या आहेत. या निवडणुका अपवाद वगळता मोठ्या गावातील निवडणुका आहेत. सातत्याने गाजत असलेली गावे आणि त्या गावातून जनमतातून सरपंच अशी निवडणूक होत आहे. यामध्ये केम, जेऊर, चिखलठाण, राजुरी, कंदर, कोर्टी, केत्तूर, रावगाव, वीट, घोटी या गावांबरोबर भगतवाडी, गौंडरे, उंदरगाव, निंभोरे, रामवाडी, कावळवाडी या गावातीलही निवडणुका आहेत. ग्रामपंचायतीच्या निवडणुका हा गावातील प्रत्येक व्यक्तीच्या अस्मितेचा व जिव्हाळ्याचा प्रश्न असतो. वर्षानुवर्षे जे संबंध असतात त्या संबंधाची परिणीती या निवडणुकीत दिसते. तसेच वर्षानुवर्षे असलेली दुश्मनी तिचे सुध्दा प्रत्यंतर या निवडणुकीत येते. जुना राग, जुने भांडण या निवडणुकीत हमखास उफाळून येतात. अशा स्थितीत कधी शाब्दीक तर कधी हातघाईची लढाई होते. कधी मुद्यावरून गुद्यावर प्रकरण जाते. हे समजत नाही त्यामुळे या निवडणुकीत निवडणूक लढविण्यापेक्षा समझोता करण्यावर जोर देण्याची नितांत गरज आहे. जर आपण वाद घालत बसलो तर समाजकारण ऐवजी वैमन्यसच हाती भेटते. ज्या पध्दतीने गावातील लोकांचा प्रश्न त्याच पध्दतीने तालुका पातळीवरील नेत्यांच्या दृष्टीने मोठ्या ग्रामपंचायती आपल्याकडे याव्यात यासाठी जोरदार प्रयत्न असतात. या मोठ्या लोकांच्या सत्ताकारणात गावपातळीवरच्या माणसांनी न पडलेले बरे ! गावागावातील सर्व गटाचे व सर्व स्तरावरचे संबंध चांगले राहण्यासाठी , गावच्या विकासासाठी गावात कायम सामंजस्य वाढण्यासाठी ग्रामपंचायतीच्या निवडणुका बिनविरोध होणे निश्चित फायद्याचे आहे. अर्थात प्रत्येकाने विचार केलातर हे शक्य आहे. स्वप्नातही बाजार समिती बिनविरोध होईल असे वाटत नव्हते. असे असूनही ही निवडणूक बिनविरोध झाली. म्हणजेच अवघड काम शक्य होत असेलतर आपल्या ग्रामपंचायतीही बिनविरेध होवू शकातात फक्त त्यासाठी सकारात्मक विचाराची गरज आहे.

## सुभाषित..

- संस्कार व विकास जो मिळवतो तो मनुष्य आणि जो मिळवत नाही तो पशु.
- सुखात तर वाटेकरी सर्वच असतात, पण दु:खात जे वाटेकरी असतात ते खरे मित्र असतात.
- पशुंना धनाची इच्छा नसते, पण माणसाला तीच इच्छा पशु बनवते.
- अंगात घातलेला कपडा किती उंची आहे यापेक्षा तो किती स्वच्छ आहे हे महत्वाचे आहे
- वीजेच्या लखलखाटापेक्षा समईची शीतलता मनाला प्रसन्नता देते.
- तरूण स्त्रीला भीती फक्त तिच्या सौंदर्यापासूनच असते.
- यश मिळवायचे असेलतर स्वत:च स्वत:वर बंधनं घालावी लागतात !

**सा.संदेश वा.वर्गणी २०० रू.**

# हसताय का..?

कधी नव्हे ते काल बायकोने पेपर वाचायला घेतला, पेपरची पहिलीच हेडींग 'स्वाईन फ्लुचे ८ बळी'
बायकोने मला हाक मारली. 'अहो ऐकलत का..?'
'हा.. स्वाईन फ्लु कोणत्या देशाचा प्लेअर आहे ?
त्याने म्हणे ८ बळी घेतले...!'

---

दुकानदार : 'कशी साडी दाखवू ?'
महिला : 'शेजारीन जळून जळून मेली पाहिजे अशी द्या !'

---

बायको : 'अहो मी एक रुपयाचे तीन कांदे आणले.'
नवरा : 'कसे काय ?'
बायको : 'एक मी विकत घेतला आणि दुसरा पळवून आणला.'
नवरा : 'मग तिसरा..?'
बायको : 'तिसरा त्याने फे कू न मारला.'

---

वडील : 'इतका मार खातोस रोज, तुला राग येत नाही का रे माझा?'
मुलगा : 'येतो ना..!'
वडील : 'मग काय करतोस तु राग आल्यावर..?'
मुलगा : 'मी टॉयलेट घासतो..!'
वडील : 'टॉयलेट घासुन राग कसाकाय शांत होतो ?'
मुलगा : 'मी टॉयलेट तुमच्या टुथब्रशने घासतो...!'



## शिवसेना वैद्यकिय मदत कक्षाच्या वतीने...

# बांधकाम कामगारांना साहित्याचे वाटप व दिव्यांगांना कृत्रिम हात पाय देण्याचे नियोजन





करमाळा(सं.प्र.) : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संवेदनशील स्वभावामुळे महाराष्ट्रातील सर्वसामान्य रूग्णांना कोट्यावधी रूपयांची मदत मिळत असून, या माध्यमातून अनेकांचे प्राण वाचण्याचे काम होत आहे. आज प्रा.शिवाजी सावंत यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने २९ दिव्यांगांना कृत्रिम हात पाय देण्याचे नियोजन करून खऱ्या अर्थाने शिवसेनेने सत्कर्म करून प्रा.सावंत यांचा वाढदिवस साजरा केला आहे; असे मत मुख्यमंत्री वैद्यकिय सहाय्यता कक्षाचे कक्षप्रमुख मंगेश चिवटे यांनी व्यक्त केले.

प्रा.सावंत यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून करमाळा व शिरूर तालुक्यातील १७० बांधकाम कामगारांना साहित्याचे वाटप करण्यात आले. शिवाय सर्व बांधकाम कामगारांना राज्य शासनाची नोंदणी पत्र देण्यात आले. यावेळी व्यासपीठावर मानूर पिठाचे गुरूगिरी शिवाचार्य महाराज, काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष सुनील सावंत, गंगुबाई संभाजी शिंदे हॉस्पीटलचे चेअरमन डॉ.सचेत पाल, सुमित चंद्रपुरी, सोलापूर जिल्हा विशेष लेखापरिक्षक श्री.डोके, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष राजेंद्र बारकुंड, शिवसेनेचे करमाळा प्रवक्ते ॲड.शिरीष लोणकर, शहरप्रमुख संजय शिलवंत, युवा सेना प्रमुख निखिल चांदगुडे, राहुल कानगुडे, सहकार सेनेचे नवनाथ गुंड, श्रीकांत गोसावी, जेऊर शिवसेना प्रमुख बाळासाहेब कर्चे, वैद्यकिय मदत कक्षाचे दिपक पाटणे, शिवकुमार चिवटे तसेच अनिल पाटील, राजेंद्र काळे, नागेश गुरव, दादा थोरा, प्रशांत नेटके आदी पदाधिकारी उपस्थित होते.

उपस्थित बांधकाम कामगारांच्या पाल्यांना शिक्षणासाठी दरवर्षी पाच हजार रूपये, घर बांधकामासाठी दोन लाख रूपये, व्यवसायासाठी एक लाख रूपये बिनव्याज कर्ज अशा योजना मिळवून देण्याचे आश्वासन शिवसेनेचे जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांनी दिले.

दिव्यांगांना कृत्रिम अवयव मोफत देण्याचे नियोजन रत्न निधी फाऊंडेशन मुंबईचे अध्यक्ष राजीव मेहता यांनी केले.

रूग्णसेवा हिच ईश्वर सेवा असून, आयुष्यात माणसांनी दुसऱ्याला मदत केली तर त्याचे पुण्य आपल्या पाठीशी येणार आहे. सत्कर्मच माणसाला समाधान देऊ शकते. शिवसेना वैद्यकिय मदत कक्षाचे हेच काम महाराष्ट्रातील सर्वसामान्य गरीब रूग्णांना मदतीचे ठरत आहे; असे मत गुरूगिरी शिवाचार्य महाराज यांनी व्यक्त केले.

करमाळ्यातील पाच हजार बांधकाम कामगारांना नोंदणी पत्र देऊन त्यांना शासनाचे सर्व लाभ देण्याचे नियोजन शिवसेनेच्या वतीने करण्यात आले असून, त्यासाठी शिवसेनेच्या कार्यालयाशी संपर्क साधावा; असे आवाहन उपजिल्हाप्रमुख अनिल पाटील यांनी केले.

# ॲड.गिरंजे यांचे वाढदिवसानिमित्त कुस्ती स्पर्धा

करमाळा(सं.प्र.) : ॲड.अशोक गिरंजे यांचे ६२ व्या वाढदिवसानिमित्त भिलारवाडी येथे १६ ऑक्टोबरला दुपारी ३ वाजता भव्य कुस्त्या आयोजित करण्यात आल्या आहेत. या स्पर्धेचे उद्घाटन आमदार संजयमामा शिंदे यांचे हस्ते करण्यात येणार असून, यावेळी उपविभागीय पोलीस प्रमुख अजित पाटील, बारामती ॲग्रोचे सुभाष गुळवे, सेवानिवृत्ती डी.वाय.एस.पी. मलोजी खाटमोडे-पाटील, सहाय्यक पोलीस निरीक्षक मिठू जगदाळे, तानाजी बापू झोळ, वैभव अवसर, ॲड.बाळासाहेब शेळके तसेच पोलीस अधिकारी सागर कुंजीर, सुधीर पाडुळे हे उपस्थित राहणार आहेत. यावेळी नामंकीत मल्लही उपस्थित राहणार आहेत. पहिली कुस्ती चांदीची गदा व १ लाख १ हजार रूपये, दुसरी कुस्ती ७५ हजार रू., तिसऱ्या ५१ हजाराच्या दोन कुस्त्या तर चौथ्या कुस्तीला ३१ हजार रू. चे बक्षीस देण्यात येणार आहे. यावेळी जास्तीत जास्त नागरीकांनी उपस्थित रहावे; असे आवाहन आयोजक सुमित गिरंजे यांनी केले आहे.




# नगरसेवक संजय सावंत यांचे स्वखर्चातून सावंतगल्ली येथे नवीन विंधनविहिर



करमाळा(सं.प्र.): करमाळा शहरातील प्रभाग क्र.२ मध्ये सतत पाण्याची टंचाई उद्भवत असल्यामुळे नागरीकांच्या सोयीसाठी प्रभाग क्र.२ चे कर्तव्यदक्ष नगरसेवक संजय सावंत यांनी स्वखर्चाने सावंतगल्ली येथे नवीन विंधनविहिर घेतली आहे. त्यांनी केलेल्या या कार्यामुळे प्रभागातील नागरीकांनी त्यांचे आभार व्यक्त केले आहे

सामाजिक कार्यकर्ते मार्तंड सुरवसे यांचे हस्ते श्रीफळ फोडून विंधनविहिरीचे काम चालू करण्यात आले. यावेळी फारूक जमादार, नागेश उबाळे, पांडूरंग सावंत, बापू उबाळे, मैनुद्दीन शेख, सतीश भिसे, औदुंबर उबाळे, काटकर, गणेश सावंत, महेश भागवत, गणेश सावळकर आदीजण उपस्थित होते. करमाळा नगरपालिकेचा अनेकवेळा पाणीपुरवठा विस्कळीत होतो. त्यामुळे या भागात प्रामुख्याने पाण्याची टंचाई जाणवत असल्यामुळे नगरसेवक संजय सावंत यांनी स्वखर्चाने विंधनविहिर घेतली असून याचा शेजारी असणारे असणारे घरगुती कामासाठी व इतर कामासाठी उपयोग होणार असून पाण्याबाबत नागरीकांचा त्रास कमी होणार आहे.नगरसेवक पदाची मुदत संपलेली असतानाही संजय सावंत हे प्रभागातील नागरीकांच्या समस्या सोडविण्यासाठी तत्पर असतात. सावंत यांचा आदर्श इतर नगरसेवकांनी ही घ्यावा; अशी चर्चा शहरवासियातून व्यक्त केली जात आहे.







सा.संदेश वार्षिक वर्गणी २०० रू. भरून वर्षभर अंक मिळवा

# सुपर सेल.. सुपर सेल.. सुपर सेल..

**फक्त रू.99 पासून रू.499 पर्यंत कोणतेही गारमेंट खरेदी करा !**



## संपूर्ण फ्रेश स्टॉक
## 80% डिस्काऊंट
देऊन थेट फॅक्टरीतून
आपल्या करमाळा शहरात !



**उपलब्ध व्हरायटी - लेडीज ॲन्ड गर्ल्स**

- बिन्दी प्रिन्टेड कॉटन टॉप
- वेस्टर्न आऊटफिट टॉप
- शिफॉन फॅन्सी टॉप
- गर्ल्स जिन्स, प्लाझो
- लेडीज फॅशन स्वेटर
- स्टाईल टॉप
- गर्ल्स शिफॉन ड्रेसेस
- लेडिज स्वेटर, लॉगं ड्रेसेस
- लेडीज होजेरी प्रिंटेड पॅन्ट
- जयपुरी प्रिंटेड कुर्ता
- ऊलन लॉगं ड्रेसेस
- लेडीज ब्लु जिन्स
- लेडीज सिल्क ड्रेसेस
- लेडीज ऊल कोट
- गर्ल्स टी-शर्ट
- लेडीज कॉटन वन-पीस
- लेडीज कॉटन पॅन्ट
- लेडीज ३/४ पॅन्ट
- लेडीज डिझाईनर टी-शर्ट
- कॉटन टॉपगर्ल्स

## सस्नेह निमंत्रण



**लेडीज गारमेंट** क्षेत्रात जगप्रसिध्द असलेल्या **'मांझा कंपनी'** चे आम्ही अधिकृत विक्रेते झालेलो आहोत. यासाठी आपल्या सदीच्छा व सहकार्य पाठीशी असावं म्हणून आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.



## मांझा फॅशन
या दुकानाचा **उद्घाटन सोहळा**

सोमवार दि.१६/१०/२०२३ रोजी सकाळी १०. वा.

**तीर्थप्रसाद/अल्पोपहार**
सकाळी १०.०० ते दुपारी २.०० पर्यंत

**प्रमुख उपस्थिती**

माजी आ.नारायण(आबा) पाटील श्री.विलासराव घुमरे
श्री.शंभुराजे जगताप श्री.गणेश करे-पाटील श्री.कन्हैय्यालाल देवी

**निमंत्रक : श्री.दादासाहेब आजिनाथ घाडगे**

**पत्ता : शॉप नं.१४३, कमलादेवी पायथ्याजवळ, श्रीदेवीचामाळ. (8484948454)**




स्व.कांतीलाल सोळंकी

तो हसरा चेहरा,
नाही कोणाला दु:खावले
मनाचा तो भोळेपणा,
कधी नाही केला मोठेपणा
उडूनी गेला अचानक प्राण,
पुनर्जन्म घ्यावा तुम्ही
हीच आमची प्रार्थना !

## स्व.कांतीलाल सोळंकी

यांचे दि.७/१०/२०२३ रोजी निधन झाले. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो, हीच आमची ईश्वर चरणी प्रार्थना व

## भावपूर्ण श्रध्दांजली

**शोकाकुल**

**किरण भुसारे, पुष्कराज शहा, कन्हैयालाल शहा, ॲड.योगेश शिंपी
मोहन वाघमारे, चंदन रजपुत, संजय पडवळे**

## भावपूर्ण श्रध्दांजली

आमच्या संस्थेचे पिग्मी एजंट धीरज सोळंकी यांचे पिताश्री **स्व.कांतीलाल सोळंकी** यांचे नुकतेच निधन झाले. त्यांचे परिवाराचे दु:खात आम्ही सहभागी आहोत. ईश्वर त्यांचे आत्म्यास चिरशांती देवो, हीच आमची भावपूर्ण श्रध्दांजली !



स्व.कांतीलाल सोळंकी

**शोकाकुल**

**मा.श्री.विलासराव घुमरे नागरी सहकारी पतसंस्था मर्या; करमाळा.** सर्व कर्मचारी स्टाफ व पिग्मी एजंट




खुशखबर खुशखबर

# श्रीराम ट्रॅक्टर्स
## करमाळा

दसरा व दिपावलीच्या सर्व शेतकरी बांधवांना हार्दिक शुभेच्छा...!





#AKSHAY PHOTO 9730036066



BOSS 50 (HP)



7250 46 (HP)



ORCHARD 30 (HP)



6028 28 (HP)

ऑफर :- कुठलाही नवीन ट्रॅक्टर घेऊन जावा*डाऊनपेमेंट फक्त २१०००/-हजार रुपये सोबत सर्व बँक लोन उपलब्ध. कमीत कमी व्याजदर व शेवटचा हप्ता माफ त्याच बरोबर मेडिकल इन्सुरन्स मिळवा.* हमखास एक भेटवस्तू मोफत मोफत मोफत आजच बुक करा

Mo.7350985555 Mo.9011148169 Mo.8600616407 Mo.9890983530


लोकनियुक्त माजी सरपंच
तुम्हाला तुमच्या आयुष्यात
खूप सारं यश मिळावं...
तुमचं जीवन उमलत्या
कळीसारखं फुलावं...
त्याचा सुगंध तुमच्या
जीवनात दरवळत राहो..
हीच कोटलिंग चरणी प्रार्थना !
श्री आदिनाथ सहकारी साखर कारखान्याचे
माजी व्हा.चेअरमन
सोलापूर जिल्हा परिषदेचे माजी सदस्य
कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक
आमच्या गावचे लोकनियुक्त माजी सरपंच
मा. चंद्रकांत (काका) सरडे
आपणांस वाढदिवसाच्या लाख.. लाख..
हार्दिक शुभेच्छा
15 ऑक्टोबर
शुभेच्छुक
समस्त ग्रामस्थ, चिखलठाण

### करमाळा तालुका प्राथमिक शिक्षक पतसंस्थेवर

# स्वाभिमानी शिक्षक पॅनलचे निर्विवाद वर्चस्व



करमाळा(सं.प्र.) : करमाळा तालुका प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या पंचवार्षिक निवडणुकीत स्वाभिमानी शिक्षक पॅनलने गुरूसेवा शिक्षक पॅनलचा पराभव केला आहे. या निवडणुकीत स्वाभिमानी शिक्षक पॅनलचे दहा संचालक तर विरोधी गुरूसेवा पॅनलचा एक संचालक निवडून आला आहे. तालुका शिक्षक पतसंस्थेवर स्वाभिमानी शिक्षक पॅनलने निर्विवाद वर्चस्व मिळविले आहे. निवडणूक निर्णय अधिकारी दिलीप तिजोरे यांनी निकाल जाहीर केल्यानंतर स्वाभिमानी शिक्षक पॅनलने विजयी आनंदोत्सव फटाके वाजवून व पेढे वाटून साजरा केला.

२ जुलैला या पतंस्थेचे मतदान होणार होते. मात्र शासनाने जाहीर झालेल्या व होणाऱ्या निवडणुका पुढे ढकल्याने करमाळा तालुका शिक्षक पतसंस्थेची निवडणूक पुढे ढकलण्यात आली. यामध्ये स्वाभिमानी शिक्षक पॅनल विरूध्द गुरूसेवा शिक्षक पॅनल असे दोन शिक्षकांचे गट एकमेंकासमोर निवडणूक लढवत होते. शिक्षक पतसंस्थेचे एकूण सभासद संख्या ७६२ होती मात्र मतदानासाठी ५८५ सभासद पात्र झाले होते. थकबाकीदार असल्याने अनेक सभासदांना मतदान करता आले नाही. या पतसंस्थेची वार्षिक उलाढाल २ कोटी पेक्षा जास्त असून कर्जमर्यादा ७.५० लाख आहे तर व्याजदर ७.२० टक्के आहे. या पतसंस्थेवर स्वाभिमानी शिक्षक परिवाराची सलग दुसऱ्यांदा सत्ता आली आहे.विजयी उमेदवारास मिळालेली मते पुढीलप्रमाणे... अरूण चौगुले (४१३), तात्यासाहेब जाधव (३६९), प्रताप काळे (२४६), अजित कणसे (३८२), निशांत खारगे (४३०), पुनम जाधव (२९६), वैशाली महाजन (३२७), सतीश चिंदे (३२८), साईनाथ देवकर (४१८), आदिनाथ देवकते (३०४) तर गुरूसेवा शिक्षक पॅनल चे हनुमंत सरडे (२६५)

# ऊस उत्पादक संघाच्या संचालक पदी विजय निकत व संतोष इंगळे




करमाळा(सं.प्र.) : महाराष्ट्र राज्य ऊस उत्पादक संघाच्या तज्ञ संचालक पदी विजय भानुदास निकत व संचालक पदी संतोष शहाजी इंगळे यांची निवड करण्यात आली आहे. श्री.निकत व श्री.इंगळे हे सर्वसामान्य शेतकरी कुटूंबातील असून स्वत: प्रयोगशील ऊस शेती करतात. याची दखल घेऊन महाराष्ट्र राज्य ऊस उत्पादक संघाचे संस्थापक अध्यक्ष भरतनाना माने-पाटील यांनी त्यांना निवडीचे पत्र दिले असून महाराष्ट्र राज्य कार्यकारिणी संचालक म्हणून काम करण्याची संधी दिली आहे.

ऊस उत्पदाकांच्या अडीअडचणी समजून घेऊन आधुनिक प्रकारे ऊसाचे उत्पादन वाढीसाठी बेणे प्लॉट, खते, औषधे, मार्गदर्शन व माहिती शिबीर आयोजित करून कमी क्षेत्रात भरघोस उत्पन्न घेणाऱ्या शेतकऱ्यांना पुरस्कार देण्यात येणार आहेत. यामध्ये राज्यातील ऊस उत्पादकांनी सहभागी होण्याचे आवाहन अतुलनाना माने-पाटील यांनी केले आहे.

विजय निकत व संतोष इंगळे यांची राज्य ऊस उत्पादक संघाच्या संचालक पदी निवड झाल्याबद्दल तालुक्यातील ऊस उत्पादकांनी त्यांचे विशेष अभिनंदन केले आहे.

कार्यक्रम तुमचा जबाबदारी आमची, तुम्ही फक्त कार्यक्रमाचा आनंद घ्या !
SK's events & management
• लग्न समारंभ • डेकोरेशन • जेवण व केटरर्स • स्वागत समारंभ • वाढदिवस • नामकरण सोहळा • डोहाळे कार्यक्रम
• डी.जे. व सांस्कृतिक वाद्य • उद्घाटन समारंभ • वास्तुशांती • फोटोशुट • मेकअप • मेहंदी आर्टीस्ट • भटजी आणि पुजा साहित्य
घरी कार्यक्रम आहे ? नियोजनासाठी कोण नाही ? घाबरू नका ? आम्हाला संपर्क करा....
पत्ता : राशिनपेठ, करमाळा. / संपर्क : सुरज (9767803011/9822598682)

# सो.जि.म.बँकेचे शाखाधिकारी राजेंद्र रणसिंग यांना पदोन्नती



करमाळा (सं.प्र.) : सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे टाकळी शाखेचे शाखाधिकारी राजेंद्र रणसिंग यांची पदोन्नतीवर सोलापूर येथील जिल्हा कार्यालयात बिगरशेती कर्ज विभाग प्रमुख म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. श्री.रणसिंग हे मुळ खातगाव येथील रहिवाशी असून, जिल्हा बँकेत २ मे १९८८ ला क्लार्क म्हणून जेऊर येथे कार्यरत झाले. त्यानंतर करमाळा, चिखलठाण, केत्तूर, पारेवाडी, साडे, टाकळी या शाखांमध्ये त्यांनी आत्तापर्यंत ३५ वर्षे सेवा केली आहे. क्लार्क, कॅशिअर, शाखाधिकारी, बँक निरीक्षक या पदावर त्यांनी काम केले आहे. नुकतीच त्यांची पदोन्नती झाली असून येत्या १६ ऑक्टोबर पासून सोलापूर येथील जिल्हा बँक कार्यालयात कार्यरत होणार आहेत. त्यांना मिळालेल्या पदोन्नतीबाबत ग्रामसुधार समिती व संदेश परिवाराकडून विशेष अभिनंदन करण्यात आले आहे.

### नवरात्र निमित्त मराठा मंदिर डेकोरेशन तर्फे

# श्रीदेवीचामाळ येथील कमलाभवानी मंदिरात भव्य डेकोरेशन

करमाळा(सं.प्र) : नवरात्र उत्सावानिमित्त श्रीदेवीचामाळ येथील कमलाभवानी मंदिरात मराठ मंदिर डेकोरेशन तर्फे भव्य डेकोरेशन करण्यात येणार आहे. या डेकोरेशनची तयारी चालू केली असून, मंदिराच्या मुख्य प्रवेशद्वारावर भव्य असे डेकोरेशन उभारण्यात येणार आहे.नवरात्र उत्सव रविवार पासून सुरू होत असून यानिमित्त मराठ मंदिर डेकोरेशनचे मालक अनिल रेगुडे यांनी गावकरी व एक भक्त म्हणून मंदिरात मुख्य दरवाजाची सजावट तसेच मंदिर परिसरात फुलांची विविध प्रकारची सजावट करण्यात येणार आहे. मंदिरात होमहवन विधीच्या ठिकाणी भव्य असा आकर्षक विधीमंडप उभारण्यात येणार आहे. विधी मंडप सजावट ही आकर्षक असणार आहे.


रेगुडे यांच्या उपक्रमाचे ट्रस्टी, गावकरी व करमाळ्यातील भाविक भक्तांनी कौतूक केले आहे.

हनी ब्युटी पार्लर
कुंकू गल्ली, करमाळा., जि.सोलापूर
काळानुरूप स्वत:मध्ये बदल घडवू पाहणाऱ्या प्रत्येक महिलांसाठी मी घेवून येत आहे अत्याधुनिक 'हायड्रा फेशियल मशीन'

मशिनचे फायदे....
• त्वचा हायड्रेट करते.
• त्वचा मॉइश्चराइझ करते.
• ऑइल कंट्रोल करते.
• पिंपल्स दूर करते.
• त्वचेची चमक(ग्लो) करते.
• स्कीन घट्ट ठेवणीस मदत करते.
फेशियल रू.400 पासून पुढे
क्लास घेतले जातील
• ग्रुप फेशियलवर डिस्काऊंट ऑफर
• सर्व प्रकारचे व्हॅक्स व सर्व प्रकारचे ब्लिच
भरपूर कलर व व्हारायटीमध्ये स्ट्रेचेबल ब्लाऊज व अंडर गारमेंट अवेलेबल आहेत.
सौ.तृप्ती मेहता (९४२१०३०००३)

पुनम एजन्सी
अंबुजा सिमेंटचे करमाळा तालुका वितरक
Ambuja Cement
• बिल्डींग मटेरियल सप्लायर्स • प्लंबींग • हार्डवेअर
स्टील, सिमेंट, फरशी, ग्रेनाईट
होलसेल व रिटेल योग्य दरात मिळेल
प्रोप्रा : प्रमोद शिंदे (9552946544) पत्ता: बायपास रोड, जेऊर.

# राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या जिल्हाध्यक्ष पदी अभिषेक आवाड



करमाळा (सं.प्र.) : करमाळा शहरातील राष्ट्रवादीचे नेते अभिषेक आवाड यांची राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या सोलापूर जिल्हाध्यक्ष पदी निवड करण्यात आली. ही निवड उपमुख्यमंत्री अजित पवार, प्रांताध्यक्ष सुनील तटकरे, युवक प्रदेशाध्यक्ष सूरज चव्हाण यांनी केली.

अभिषेक आवाड यांची सुरूवात राष्ट्रवादीचे करमाळा शहर सचिव म्हणून झाली. नंतर सलग तीन वेळेस ते करमाळा शहराध्यक्ष, सोलापूर वरीष्ठ जिल्हा उपाध्यक्ष तसेच निरीक्षक आणि आता सोलापूर जिल्हाध्यक्ष पद हे त्यांना पक्षाने कामाची दखल घेऊन दिले आहे. करमाळ्यासारख्या ग्रामीण भागातून सर्वसामान्य कुटूंबातील युवकाला सोलापूर जिल्हाध्यक्ष पदाची मोठी जबाबदारी अभिषेक आवाड यांना मिळाल्यामुळे करमाळा तालुक्यातील युवक राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये नवचैतन्याचे वातावरण निर्माण झालेले आहे.

प्रामाणिकपणे आणि निष्ठेने काम केल्यावर त्याचे फळ नक्की मिळते, यावर आपला विश्वास असल्याने राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या सोलापूर जिल्हा अध्यक्ष पदाची जबाबदारी उपमुख्यमंत्री अजित पवार व सर्व नेत्यांच्या विश्वासाला सार्थ ठरवून पार पाडणार असल्याचे अभिषेक आवाड यांनी सांगितले.

गेल्या अनेक वर्षापासून युवकांचे प्रश्न सोडविण्यासाठी आंदोलनाच्या माध्यमातून आवाज उठवून युवकांना न्याय मिळवून देणारे, प्रचंड संघर्षातून उभे राहून आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर नेतृत्व सिध्द करणारे अभिषेक आवाड यांना महाराष्ट्रातील अनेक नेत्यांनी व कार्यकर्त्यांनी सोशल मिडीयाच्या माध्यमातून शुभेच्छा दिल्या आहेत. निश्चितच अभिषेक आवाड यांचे काम करण्याची जिद्द आणि चिकाटी पाहिलं की राष्ट्रवादी युवक काँग्रेची एक मजबूत युनिट उभे राहून राष्ट्रवादी पक्ष उंच भरारी घेईल; असा विश्वास सर्वसामान्य जनतेतून व्यक्त केला जात आहे. अभिषेक आवाड यांचे निवडीप्रसंगी आमदार संजयमामा शिंदे, प्रदेश प्रवक्ते उमेश पाटील, जिल्हाध्यक्ष दिपक आबा साळुंखे-पाटील, प्रदेश सरचिटणीस लतीफभाई तांबोळी, माळशिरसचे नेते सुरेश पालवे, बापू पाटील, सुभाष पाटील व जिल्ह्यातील वरीष्ठ नेते उपस्थित होते.

# आदिनाथ कारखान्याचा १५ ऑक्टोबरला बॉयलर अग्नीप्रदीपन सोहळा

करमाळा(सं.प्र.) : श्री आदिनाथ सह.साखर कारखान्याच्या २८ व्या ऊस गळीत हंगामाचा बॉयलर अग्नीप्रदीपन कार्यक्रम १५ ऑक्टोबरला सकाळी ११ वा. ५ मि. घटस्थापनेच्या शुभमुहूर्तावर शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख प्रा.शिवाजीराव सावंत यांचे हस्ते व भैरवनाथ शुगर्सचे कार्यकारी संचालक पृथ्वीराज सावंत यांचे अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे. यानिमित्त होमहवन व सत्यनारायण महापुजा प्रशासकीय मंडळ सदस्य महेश चिवटे व त्यांच्या सुविद्य पत्नी यांचे हस्ते होणार आहे.


डॉ.नायकुडे यांचे डोळ्यांचा दवाखाना **श्रीजय नेत्र रूग्णालय**

**डॉ.भाग्यश्री रामकृष्ण नायकुडे** (नेत्रतज्ञ व शल्य चिकित्सक)
B.A.M.S.,M.S.(Shalakya-Netra) (Gold Medalist) Reg no.1-77199-A

करमाळा शहरामध्ये मोतीबिंदू (Cataract), डोळ्यांवरील पडदा(Pterygium) तिरळेपणा (Squint) यासारख्या डोळ्यांच्या सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया अत्याधुनिक मशिनद्वारे(फेको लेझर) व तज्ञ डॉक्टरांच्या मार्फत केल्या जातील.

वेळ : सोमवार ते शनिवार स.१०.३० ते सायं ७ (रविवार बंद) इमर्जन्सी सेवा उपलब्ध

**श्रीजय ऑप्टिकल** (सर्व प्रकारचे चष्मे तयार करून मिळतील.)

श्री कमलादेवी रोड, कृष्णाजीनगर, करमाळा. मो.९८३४०७१२१८, ९९२१०१३४९३



प्रवेश! महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे संचलित सरकारमान्य प्रवेश!!

**अशोक कॉम्प्युटर टायपिंग इन्स्टिट्यूट**

इंग्रजी : (३०-४०) मराठी : (३०-४०) हिंदी : (३०-४०)

टायपिंग क्लाससाठी प्रवेश देणे सुरु आहे

किल्ला विभाग, करमाळा. मो.८०८७९०५०८५



**डॉ.राऊत** Advanced dental Clinic & Root Canal Center

**दातांचा दवाखाना**

Smile with confidence

उपलब्ध सुविधा...
- इंटराओरल कॅमेराद्वारे तपासणी
- डिजीटल एक्स-रे
- अत्याधुनिक यंत्रणेद्वारे रूट कॅनल ट्रिटमेंट
- वेदनारहित दात व दाढ काढणे
- पडलेले दात बसविणे
- दात साफ करणे
- दाताच्या रंगाचे सिमेंट भरणे/चांदी भरणे



डॉ.कौस्तुभ काशिनाथ राऊत
बी.डी.एस.
(डेन्टल सर्जन)

उपलब्ध सुविधा...
- स्क्रुच्या सहाय्याने दात बसविणे (डेंटल इम्प्लांट)
- अक्कलदाढ काढणे
- वेडेवाकडे पुढे आलेले दात सरळ करणे
- अंशत: किंवा पूर्ण कवळी बसवणे
- हिरड्यांच्या रोगासाठी ट्रिटमेंट
- कॉस्मेटिक ट्रिटमेंट
- कर्करोगाचे निदान
- गरजेनुसार तज्ञ डॉक्टरांच्या भेटी

महात्मा गांधी शाळेच्या पाठीमागे, पुणे रोड, करमाळा. (मो.9552134186)


# मांगी येथे केंद्रीय नवभारत साक्षरता प्रशिक्षण संपन्न



करमाळा(सं.प्र.) : नवभारत साक्षरता कार्यक्रम जातेगाव केंद्राचे प्रशिक्षण जिल्हापरिषद प्राथमिक शाळा मांगी येथे संपन्न झाले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून केंद्रप्रमुख संतोष पोतदार उपस्थित होते. सुरूवातीला सावित्रीबाई फुले यांचे प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी वर्षा वाघावकर, नवनाथ ससाणे, पिसाळ मॅडम, राजेंद्र राऊत, हौसराव काळे, वैशाली रोकडे, बाळासाहेब देशमाने, प्रगती विद्यालयाच्या देशमाने मॅडम, भैरवनाथचे पोपट माने उपस्थित होते. केंद्रप्रमुख संतोष पोतदार यांनी मार्गदर्शन केले. तज्ञ मार्गदर्शक म्हणून गणेश आडेकर, नाना वारे यांनी मार्गदर्शन केले. पूर्व चाचणी, उत्तर चाचणी सोडवून घेतली. जी आर वाचन घेण्यात आले. आभार नाना वारे यांनी मानले.

# पाडळी शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्ष पदी आबासाहेब वायकर



करमाळा(सं.प्र.) : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पाडळी च्या शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्ष पदी आबासाहेब वायकर यांची तर उपाध्यक्ष पदी भास्कर पाटील यांची निवड करण्यात आली आहे. सदस्य पदी गोटीराम पवार, सुधाकर पाटील, पांडूरंग ढाणे, भाऊसाहेब शिंदे, अश्विनी ढाणे, मनीषा जाधव, शारदा जगताप, मीराबाई जाधवर, सानिका वायकर, संभव पवार यांची निवड करण्यात आली. यावेळी ग्रामस्थ, पालक व शिक्षक उमेश कानडे, सुरेश आटोळे, चंद्रकांत जाधवर, सुधीरराजे चव्हाण, मीराबाई जाधवर, दीपमाला अनंतकळस, मुख्याध्यापक जालिंदर भोसले उपस्थित होते. शाळा व्यवस्थापन समितीच्या नूतन पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन सरपंच अनिल पिंपरे, चेअरमन शहाजी शिंगटे, गौतम ढाणे यांनी केले.


**नवरात्र व दसऱ्याच्या शुभेच्छा !**

नवरात्र म्हणजे शक्तीची उपासना व दसरा म्हणजे विजयाचा उत्सव !

नवरात्रामध्ये पुढील शक्तीवर्धक उत्पादनांवर 5% सुट

- **शतावरीकल्प** : शरीरातील रसधातू, अम्लपित्त, पाळीच्या समस्यांसाठी
- **अस्थीपोषक वटी** : शरीरातील अस्थीधातूच्या पोषणांस व कंबर, सांधेदुखीसाठी
- **लोहासव** : रक्तवाढीसाठी • **द्राक्षासव** : भूक वाढण्यासाठी
- **अश्वगंधारिष्ट** : ताकद, उत्साह वाढवण्यासाठी
- **पंचकोलासव/पंचारिष्ट** : पचनशक्ती वाढवण्यासाठी

वेळ : सकाळी ९.३० ते २ व सायंकाळी ३ ते ७

कालावधी : घटस्थापना दि.१५/१०/२०२३ ते दसरा दि.२४/१०/२०२३ या कालावधीकरीता लागू

रविवार बंद

स्थळ : **अभंग आयुर्वेद** श्री छत्रपती शिवाजीनगर (सागर थिएटर मागे), करमाळा.

मोटारसायकल व छोटाहत्तीची धडक

## मोटारसायकलस्वार जागीच ठार

करमाळा (सं.प्र.) : मोटारसायकल व छोटाहत्ती यांची समोरासमोर धडक होऊन झालेल्या अपघातात मोटारसायकलस्वार जागीच ठार झाला आहे. हा अपघात जिंती येथे १२ ऑक्टोबरला सकाळी सव्वाअकरा वाजता घडला आहे. या प्रकरणी कांतीलाल दामोदर कदम (रा.वाशिंबे) यांनी फिर्याद दिली आहे. यात त्यांनी म्हटले आहे, की बाळासाहेब दामोदर कदम (वय-५२) हा वरकटणे (ता.करमाळा) येथे कुटूंबासह राहत आहे. भिगवण येथे काम असल्याने १२ ऑक्टोबरला तो मोटारसायकल क्र.एम एच ४५ एक्स५१३४ वरून निघाला होता. जिंती जवळील जाधव वस्ती येथे जात असताना समोरून छोटा हत्ती क्र.एमएच १२ आरएन ९४६० यावील चालकाने निष्काळजीपणाने छोटाहत्ती चालवून माझ्या भावाच्या मोटारसायकलीस समोरून धडक दिली. त्यात माझा भाऊ जखमी होऊन जागीच ठार झाला आहे. यात पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

## शेतातील पीक मोडणाऱ्या तिघांविरूध्द गुन्हा दाखल

करमाळा(सं.प्र.) : शेतातील पीक मोडणाऱ्या तिघा जणांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा प्रकार १० ऑक्टोबरला सकाळी सहा वाजता केडगाव येथे घडला आहे. या प्रकरणी राजेंद्र परशुराम राऊत (रा.केडगाव) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की केडगाव येथे गट नं.११५ मध्ये एक एकर शेती आमची आहे. माझे वडील एप्रिल २०२३ मध्ये मयत आहेत. माझ्या वडीलांनी हयात असताना ललिता राजेश बोराडे यांचे नावे बिगरकब्जा रजिस्टर साठेखत करून दिले आहे. परंतु कब्जा आमचाच आहे. त्यात आमचे मक्याचे पीक आहे. १० ऑक्टोबरला सकाळी सहा वाजता राजेश सुर्यकांत बोराडे , ललिता राजेश बोराडे व रितेश राजेश बोराडे यांनी माझ्या शेतात ट्रॅक्टर घालून अतिक्रमण करून मक्याचे पीक मोडले आहे. यात पोलीसांनी गुन्हा दाखल केला आहे.

## सेवानिवृत्त कर्मचारी संघाची १८ ऑक्टोबरला सहविचार सभा

करमाळा(सं.प्र.) : करमाळा तालुका सेवानिवृत्त कर्मचारी संघाची सहविचार सभा १८ ऑक्टोबरला दुपारी १ वा. श्री स्वामी समर्थ मंदिर फंडगल्ली येथे आयोजित करण्यात आली आहे. तरी या सभेला सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी उपस्थित रहावे; असे आवाहन अध्यक्ष भागवत घाडगे व सचिव नारायण घोलप यांनी केले आहे.

'एस.पी.कडे तक्रार करतोय काय' असे म्हणत..

## वैद्यकिय अधिकाऱ्यास महिलेसह तिघांकडून मारहाण

करमाळा(सं.प्र.) : एस.पी.कडे तक्रार करतोय काय.. असे म्हणत महिलेसह तिघा जणांनी तालुका वैद्यकिय अधिकाऱ्यास वीटेने मारहाण केली तर चाकुने पोटावर हल्ला केला आहे. हा प्रकार १० ऑक्टोबरला सकाळी नऊ वाजता साडे येथे घडला आहे. या प्रकरणी डॉ.रविंद्र भगवान पुंडे (रा.साडे) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की साडे गावातील प्राथमिक आरोग्य केंद्राचा अधिभार माझ्याकडे आहे. तसेच मी साडे गावातील रहिवाशी असल्याने गावातील अनेकांच्या ओळखी आहेत. आमच्या गावातील अंगणवाडी सेविकेस मदतनीस असलेले फरतडे हिची ओळख होती. ती मला पैसे मागत होती. तिला पैसे दिले नाहीत त्यामुळे ती सतत मला त्रास देत असल्याने मी एस.पी. कार्यालयाकडे तिची तक्रार केली होती. त्यावर चिडून १० ऑक्टोबरला तिने व तिची मुले किरण गायकवाड व तेजस् गायकवाड यांनी मारहाण केली. ती माझ्या डाव्या हाताला चावली तर किरण याने वीट फेकून मारली तसेच लहान सुरी माझ्या पोटात मारली. त्यानंतर गावातील लोकांनी सोडवासोडव केली. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक विनायक माहुलकर हे करत आहेत.

## दोन ट्रॉलीच्या धडकेत पोंधवडी येथील युवकाचे निधन



करमाळा(सं.प्र.) : दोन ट्रॉल्या एकमेकांना जोडताना चालकाच्या निष्काळजीपणाने दोन्ही ट्रॉल्या एकावर एक आदळून ट्रॉल्या जोडण्यासाठी गेलेल्या तरूणाचे दोन ट्रॉल्याचा दाब बसल्याने निधन झाले आहे. हा प्रकार पोंधवडी येथे २९ सप्टेंबरला दुपारी सव्वादोन वाजता घडला आहे. या प्रकरणी नागेश रमेश राऊत (रा.पोंधवडी) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की २९ सप्टेंबरला सकाळी सात वाजता माझा भाऊ दिगंबर राऊत हा गावातील रामा गाडे यांच्या वीटभट्टीवर वीटाचे तुकडे भरण्यासाठी निघून गेला होता. हे काम केल्यानंतर दोन ट्रॉल्या एकमेकांना जोडत असताना ट्रॅक्टर चालक बिभिषण विलास मत्रे याने निष्काळजपणाने दोन्ही ट्रॉल्या जोरात आदळल्याने त्यात माझा भाऊ दिगंबर राऊत (वय-२३) हा मरण पावला आहे. या प्रकरणी पोलीसांनी चालकाच्या विरूध्द गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रविण साने हे करत आहेत.

## कंदर येथील १७ वर्षाची मुलगी बेपत्ता

करमाळा(सं.प्र.) : कंदर येथील १७ वर्षाची मुलगी ४ ऑक्टोबरला घरात कोणी नसताना बेपत्ता झाली आहे. या प्रकरणी मुलीच्या आजीने पोलीसात पळवून नेल्याबाबत फिर्याद दिली आहे. सदर फिर्यादीत त्यांनी म्हटले आहे, की माझी १७ वर्षाची नववी पास झाली असून तेव्हापासून ती घरीच असते. घरातील आम्ही सर्वजण कामाला जात असतो. माझी नात मात्र घरीच असते. ४ ऑक्टोबरला दुपारी १२ वाजता माझा नातू हा शेतात आला व माझी नात घरात नाही असे सांगितले. त्यानंतर सर्वत्र चौकशी करूनही तिचा शोध लागला नाही. याचा अर्थ तिला कोणीतरी अज्ञात कारणावरून अज्ञात व्यक्तीने फुस लावून पळवून नेले आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

## वनविभागाच्या कर्मचाऱ्यांना मारहाण

करमाळा(सं.प्र.) : वनविभागाच्या जागेत लावलेली झाडे मोडून जमीन सपाटीकरण करून तेथे वनविभागाचे कर्मचारी पुन्हा वृक्षारोपणासाठी आले असता, पाच जणांनी त्यांना मारहाण करून त्यांनी काढलेले फोटो व व्हिडीओ डिलीट करून शासकीय कामकाजात अडथळा आला आहे. हा प्रकार १० ऑक्टोबरला दुपारी साडेबारा वाजता घडला आहे. या प्रकरणी वनरक्षक सुरेश रामचंद्र कुर्ले (ह.रा.मोहोळ) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की जिंती येथील राखीव जमीन वनजमीन गट नं.११८/४२ ब यावर वनविभागाकडून ७०७३ खड्डे खोदून निंब सिसुखैर, करंज इ. झाडे लावली होती. त्यामध्ये जिंती येथील दादा हरी शेलार, बापू पंढरीनाथ शेलार, सुखदेव पंढरीनाथ शेलार यांनी जेसीबी व ट्रॅक्टर लावून लावलेल्या झाडाचे नुकसान करून जमीनीचे सपाटीकरण केले आहे. याबाबत गुन्हेही दाखल आहेत. त्याच ठिकाणी मी वनरक्षक सागर जवळगी, वनमजूर नारायण चव्हाण, व रोजंदारीवरील मजूर असे मिळून त्या ठिकाणी रोप लागवड करत होतो. त्यावेळी सोमनाथ दादा शेलार , सुखदेव पंढरीनाथ शेलार, रेखा सुखदेव शेलार, पुजा सोमनाथ शेलार व माऊली शेलार (सर्व रा.जिंती) यांनी अटकाव करून मजुराच्या गालावर चापट मारून दमदाटी करून मोबाईल हिसकावून घेऊन त्यातील फोटो व व्हिडीओ डिलीट केला व शासकीय कामकाजात अडथळा आणून काम बंद पाडले. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रविण साने हे करत आहेत.

जाधव-पाटील हॉस्पिटल
करमाळा अर्बन बँक शेजारी, मेनरोड, करमाळा., जि.सोलापूर
आमचे येथे तज्ञ डॉक्टरांच्या भेटी

डॉ.महेश घुगे
D.N.B. Surgeon
प्रत्येक महिन्याचा पहिला रविवार
वेळ : सकाळी ११ च्या पुढे...

डॉ.प्रतिक पाटील
कॅन्सर व रक्त विकार तज्ञ
दर महिन्याचा ४ था मंगळवार
वेळ : सकाळी १०.०० ते १.००

डॉ.दर्शन गौड M.B.B.S. M.S.Mch
मेंदू व मणका शस्त्रक्रिया तज्ञ
प्रत्येक महिन्याचा पहिला शुक्रवार
वेळ : सकाळी ११ च्या पुढे...

डॉ.राहुल जाधव
पोट विकार तज्ञ
दर महिन्याचा ४ था रविवार
वेळ : सकाळी १०.०० ते १.००

डॉ.प्रमोदकुमार सुर्वे
मणका व सांधे विकार तज्ञ
प्रत्येक महिन्याचा ४ था शुक्रवार

डॉ.संदीप गाडे
(M.D.Med.,D.M.Cardio)
हृदयरोग तज्ञ वेळ : सकाळी ११ च्या पुढे
प्रत्येक महिन्याचा पहिला रविवार

डॉ.अतुल कोकाटे
मानसोपचार व मेंदू विकार तज्ञ
दर दुसरा महिना २ रा रविवार
वेळ : दुपारी ३.०० ते ५.०० पर्यंत

डॉ.आनंद काशिद
मुत्रविकार तज्ञ, लैंगिक विकार तज्ञ आणि किडनी ट्रान्सप्लान्ट सर्जन
दर महिन्याचा पहिला रविवार
वेळ : दुपारी २.०० ते ४.०० पर्यंत

नावनोंदणी संपर्क
फोन : (02182) 299611 मो.9146843871, 7507314133

म्हशीचे शेणखत
विकणे आहे
संपर्क : 7774899605, 7522934272
पत्ता : मच्छिंद्र मावलकर, मावलकर वस्ती, झरे, ता.करमाळा.

# मराठा मंदीर डेकोरेशन

प्रोप्रा : अनिल रेगुडे (मो.9158728500 / 8855885578)

- लग्न समारंभ
- साखरपुडा
- नामकरण
- डोहाळजेवण
- गेट टुगेदर
- वाढदिवस
- मुंजविधी
- मंदिर डेकोरेशन
- कार डेकोरेशन
- बेबी वेलकम
- उद्घाटन सोहळा
- सत्कार समारंभ

## लग्न समारंभ डेकोरेशन सेटअप

- भव्य २०० प्रकारचे लग्नाचे सेट
- हळदीसाठी १०० सेट उपलब्ध
- मेहंदीसाठी २५ सेट उपलब्ध
- नवरा-नवरीसाठी आकर्षक बंगी
- आकर्षक वेलकम गेट
- मागणीनूसार राजवाडा स्टेज
- ६० फुट लांबीचा ओपन ग्राऊंड स्टेज सेटअप उपलब्ध
- सर्व प्रकारच्या लाईट-LED/माळा/फोकस
- पायरो फटाका/स्मोक क्राऊन एन्ट्री



### वाढदिवस डेकोरेशन सेटअप



ONE नाव, बलून डेकोरेशनल, सोफा सेट कार्टून सेटअप, फ्लोअर पॉट, स्टेज कार्पेट, लहान मुलांसाठी बंगी, वेलकम गेट, LED लाईट, लाईटमध्ये Happy Birthday नाव प्रशस्त स्टेज- १२ x १६, १६ x १६, २० x १२

### डोहाळ जेवण डेकोरेशन सेटअप



झोपाळा-१, चंद्र-१, हरीण डेकोरेशन-२ डिजीटल बोर्ड फोटो-१, झुंबर-३, कार्टून-२ 'कुणी तरी येणार गं-लाईटिंग नाव, पिसाऱ्यातील मोर, स्टेजवरील सोफा प्रशस्त स्टेज (२० x १२, २० x १६)



मागणीनुसार नवरा-नवरीसाठी हेलिकॉप्टर सुविधा उपलब्ध

### नामकरण समारंभ डेकोरेशन सेटअप



चंद्र सेटअप पाळणा/राजस्थानी, महाराष्ट्रीयन पाळणा डिजीटल बोर्ड फोटो, कार्टून डिझाईन, वेलकम गेट बलुन डेकोरेशन, बाळासाठी बंगी एन्ट्री, माझे नांव का ?/शंखामध्ये नांव/लखोटामध्ये नांव प्रशस्त स्टेज- १२ x १६, १६ x १६, २० x १२

### मुंज विधी डेकोरेशन सेटअप



ऋषीमुनी सेटअप, बटू कार्टून, वेलकम गेट भव्य स्टेज (२० x २०), सोफा सेट, पूर्ण कार्पेट मातृ भोजन सेट, मोर डेकोरेशन, बलुन डेकोरेशन डिजीटल बोर्ड फोटो सेट

सर्व शुभकार्यासाठी 'मराठा मंदिर डेकोरेशन' सज्ज आहे !

संपर्क : मो.नं.9158728500, 8855885578

# महालक्ष्मी कलेक्शन (पोटेगावकर)





दसरा व दिपावली निमित्त स्पेशल ऑफर

- १ रुपयात परकर १,००० रु खरेदीवर
- २ रुपयात पीस+परकर+स्टॉल २,००० रू खरेदीवर
- ३ रुपयात ब्रॉकेट काटपदर साडी ३,००० रू खरेदीवर
- ४ रुपयात सुनबाईच्या साडीवर सासूबाई ची साडी ७९९ रू ४,००० रू खरेदीवर
- ५ रुपयात नवरीचा शालू ५,००० रू खरेदीवर
- ५ हजारचा शालू १,००० रू मध्ये
- १० रुपयात jio mobile १,४९९ १०,००० च्या खरेदीवर



शाखा नं.१ : पवार वस्ती, पोटेगाव, संगोबा-तरटगाव रोडवर, ता.करमाळा.
शाखा नं.२ : महामुनी कॉम्प्लेक्स(महामुनी ज्वेलर्स शेजारी) दत्तपेठ, करमाळा.

आपल्या सेवेसाठी नव्याने सुरू..

# कमलाई स्वीटस्

आमचेकडे राजस्थानी गुजराती व बंगाली मिठाई मिळेल !

- पेढा काजुकतली बर्फी कलाकंद
- बेकरी उत्पादन
- चकली चिवडा, लाडू जामून जिलेबी
- पाणीपुरी वडापाव पॅटीस
- कोल्ड्रींक्स सर्व प्रकारचे थंड पेय
- ड्रायफ्रुटस् बदाम व काजू तसेच म्हैसुरपाक

प्रोप्रा : देवासी बंधू
मो.8888980006
मो.9423141870

पार्टीसाठी समोसा, ढोकळा, जिलेबी, पॅटीस,वडापाव, पाणीपुरी ऑर्डरप्रमाणे तयार करून मिळेल..!

पत्ता कमलाई स्वीटस् एस.टी.स्टॅन्ड समोर, करमाळा.